# प्रकरण - ९
## भक्ती व ज्ञान यांचे सारुप्य

भक्ती आणि ज्ञान यांत काहीही भेद नाही. जसे सगुणाचे पर्यवसान निर्गुणात होते, तशी भक्तीसुद्धा ज्ञान बनते. कर्म, ज्ञान आणि भक्ती ही पृथक् तत्त्वे आहेत हे मी मान्य करणार नाही. किंबहुना, या पैकी हे पहिले, हे दुसरे आणि हे तिसरे असे वर्गीकरण करणेही मला पसंत नाही. या तिन्हींचे संमिश्रण किंवा समुच्चयही मी स्वीकार करणार नाही. कर्म हीच भक्ती, भक्ती म्हणजेच ज्ञान. मैसूरपाकाच्या वडीला गोडी, वजन आणि आकार असतो. या तिन्हींना विभागता येत नाही. वडीच्या प्रत्येक तुकड्यामध्ये गोडी, वजन आणि आकार अंतर्भूत असतात. एका तुकड्यामध्ये फक्त गोडी, दुसऱ्यामध्ये वजन आणि तिसऱ्या तुकड्यामध्ये फक्त आकार असे असत नाही. तुकडा जिभेवर ठेवला की एकाच वेळी चव कळते, तुकडा विरघळून वजन कमी होत जाते आणि आकार बदलत जातो. याचप्रमाणे जीव, आत्मा आणि परमात्मा विभिन्न नाहीत, ते सर्व एकच आहेत.

म्हणून व्यक्तीचे प्रत्येक कार्य हे सेवा, प्रेम आणि ज्ञान भावनेने संपृक्त असले पाहिजे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास जीवनातील प्रत्येक कार्यसमूह कर्म, भक्ती आणि ज्ञान यांनी युक्त असला पाहिजे. वस्तुतः हाच पुरुषोत्तम योग होय. हा केवळ शाब्दिकरित्या नव्हे, तर प्रत्यक्ष आचरणात आणला पाहिजे. भक्ती आणि ज्ञानाने नित्य विकसित होणाऱ्या हृदयाने साधना निरंतर केली पाहिजे. नामामृताचे माधुर्य हेच जीवनाचे आकर्षण आहे. नामापासून प्राप्त होणारा आंतरिक आनंद हा बाह्य जीवनातील आनंदासदृश आहे.

जेव्हा कर्म ईश्वरार्पण बुद्धीने केले जाते, तेव्हा त्या कर्म करणाऱ्याचा स्वार्थ, परार्थ

आणि परमार्थ एकरूप होऊन जातो. प्रथम 'मी' व 'तू' मिळून 'आपण' बनतो. नंतर 'आपण' आणि 'तो' एकत्व पावतात. जीवाने प्रथम प्रकृतीशी आणि नंतर परमात्म्याशी तादात्म्य साधावे. **'ओम् तत् सत् ।'** या मंत्राचा खरोखर हा अभिप्राय आहे.

**'ओम् तत् सत् ।'** हे आज, काल आणि उद्या आहे, होते आणि असणार आहे. 'मी' आणि 'तो' सदैव आहेतच. साधना सुद्धा नित्य आहेच. ज्या प्रकारे सूर्य आणि किरणे यांना भिन्न करता येत नाही, त्याप्रमाणे साधकाने आपल्या साधनेपासून कुदापी विभक्त होऊ नये. ज्या वेळी साधक साधनेशी अशा प्रकारे अखंड अनुसंधान ठेवतो, त्या वेळीच तो 'ओम्' ह्या प्रणवनादाशी एकरूप झाला आहे, असे म्हणता येईल.